**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 09.05.2025** **वार- शुक्रवार**

---

**मुख्यमंत्री**

भारत आणि पाकिस्तानातील तणावाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पोलिस आणि प्रशासकीय यंत्रणेकडून राज्यातील एकंदर सुरक्षा आणि सज्जतेचा आढावा घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते. प्रत्येक जिल्ह्यात मॉकड्रिल करा आणि जिल्हा स्तरावर वॉर रूम स्थापित करा. ब्लॅकआऊट म्हणजे काय आणि अशावेळी काय करावे, यांचे व्हिडिओ विद्यार्थी, नागरिकांपर्यंत पोहोचवा. व्यापक जनजागृती करा. प्रत्येक जिल्ह्यात पोलिसांच्या सायबर सेलने समाजमाध्यमांवर देखरेख ठेवत पाकिस्तानला मदत करणारे हॅण्डल ओळखून त्यावर कारवाई करा. शत्रूला मदत करणारी अथवा चुकीची माहिती कुणी प्रसारित करीत असेल तर त्यावर कारवाई करा असे काही निर्देश यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले.

**पणन मंत्री**

राज्यातली शेतमाल कृषी व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी नियोजन करावं,असे निर्देश राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी आज महाराष्ट्र कृषी पणन मंडळाच्या अधिकाऱ्यांना दिले.  पुण्यात झालेल्या

महाराष्ट्र राज्य कृषी उत्पन्न मंडळाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर राज्यातल्या शेतमालाचं विपणन वाढवण्यासाठी पणन मंडळाला वर्तमान व्यवस्थेशी सांगड घालून वेगानं काम करावं लागेल असं रावल म्हणाले.

**एसटी**

2025-26 पासून एसटी महामंडळाच्या 20 हजार बसेस पर्यावरण पूरक सीएमजी, एलएनजी इंधनासह हायब्रीड डिझेल इंधनावर चालणाऱ्या असतील अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. पर्यावरणपूरक इंधनासंदर्भात एसटी अधिकारी आणि इंधन पुरवठादारांची बैठक सरनाईक यांच्या उपस्थितीत झाली, त्यावेळी ते बोलत होते. यामुळे इंधनावरील खर्चात बचत होऊन प्रदूषण कमी होण्यासदेखील मदत होणार आहे असं सरनाईक म्हणाले.

**काजू मंडळ**

काजूच्या उत्पादन वाढीसाठी जगातल्या चांगल्या काजू वाणाचा अभ्यास करून राज्यात त्याची लागवड करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करावं अशी सूचना राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी केली आहे. महाराष्ट्र राज्य काजू मंडळाची आढावा बैठक आज रावल यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी त्यांनी ही सूचना केली. काजू उद्योगांना अद्ययावत करण्यासाठी व्हिएतनाम, कंबोडिया यांसारख्या देशातील प्रगत तंत्रज्ञानाचा अभ्यास करावा असं त्यांनी सांगितलं.

**पाणी मागणी**

पिंपरी चिंचवड शहरात गेल्या काही आठवड्यापासून नागरिकांकडून पाण्याची मागणी वाढत आहे. नागरिकांना पावसाळ्यापर्यंत शुद्ध पाणी देण्यासाठी महापालिकेनं अनधिकृत कनेक्शनवर कडक कारवाई, रेन वॉटर हार्वेस्टिंगची देखभाल, नवीन पाणी पुरवठा कनेक्शनसाठी स्थगिती, गाड्या, रस्ते धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याच्या वापरावर बंदी यासारख्या उपाय योजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे.

**नदीसुधार**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं वाकड ते सांगवी दरम्यान मुळा नदीसुधार प्रकल्पाचं काम सुरू आहे. यादरम्यान पिंपळे निलख जवळ राडारोडा टाकून नदीचा मार्ग बदलण्याचा प्रयत्न होत आहे. याला जलसंपदा विभागानं हरकत घेतली असून त्वरित हा राडारोडा काढून टाकावा अशी नोटीस महापालिकेला बजावली आहे. शहरातील काही पर्यावरण प्रेमी संघटनांनी याविषयीची तक्रार गेल्या महिन्यात जलसंपदा विभागाकडे घेतली होती.

**डीआयएटी**

संरक्षण मंत्रालयातर्फे आज पुण्यातील संरक्षणविषयक आधुनिक तंत्रज्ञान संस्था अर्थात डीआयएटी चा स्थापना दिवस साजरा करण्यात आला. 1952 मध्ये पुण्यातील लष्करी अभियांत्रिकी महाविद्यालयात इन्स्टीट्यूट ऑफ आर्मामेंट स्टडीज या नावानं या संस्थेची स्थापना करण्यात आली होती. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सर्वोत्कृष्ट शिक्षक,

सर्वोत्कृष्ट पीएचडी प्रबंध आणि सर्वोत्कृष्ट सहायक कर्मचारी पुरस्कार प्रदान करण्यात आले.

**कार अपघात**

कल्याणी नगर वाहन अपघात प्रकरणी विशेष न्यायालयानं आरोपी आशिष मित्तल आणि अरुण कुमार सिंग या दोघांचा जमीन अर्ज फेटाळला. पुराव्याची छेडछाड केल्या प्रकरणी हे दोघं तुरुंगात आहेत. गेल्या वर्षी 18 मे रोजी हा अपघात झाला होता.

**क्रिकेट**

13 वर्षाखालील मुलांच्या पुणे क्रिकेट करंडक आंतरक्लब एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत पीडीसीए ॲकॅडमी, क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमी, महाराष्ट्रीय मंडळ ॲकॅडमी आणि चंद्रन पानीकर क्रिकेट ॲकॅडमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून पुढच्या फेरीत प्रवेश केला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दुपारी पावसाच्या हलक्या सरी बरसल्या. कमाल तापमान 31 तर किमान तापमान 21 अंश सेल्सिअस होतं. उद्याही तापमान असंच असेल आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह हलका पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**